ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५८ वा | गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे जोरदार शक्तीप्रदर्शन

## अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची धावपळ

### जिल्हा परिषदसाठी ९० अर्ज तर पंचायत समितीसाठी १०१ अर्ज प्राप्त







**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी आज अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची मोठी धावपळ पहायवास मिळाली. मोहोळ तालुक्यातील ६ जिल्हा परिषद व १२ पंचायत समितीच्या जागांसाठी एकूण १९१ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असून आज अखेरच्या दिवशी भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शिवसेनेने जोरदार शक्ती प्रदर्शन केले आहे.

होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती च्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या आज अखेरच्या दिवशी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, भीमा शुगरचे व्हाईस चेअरमन सतीश जगताप, माजी उपसभापती मानाजी माने, रामदास चवरे, सुनीता अशोक भोसले, काजल अंकुश अवताडे, लखन शिंदे, ज्योत्स्ना पाटील, पार्वती कालिदास गावडे, बिरुदेव मोटे, सुलेमान तांबोळी, अश्विनी नरसिंह पाटील, शंकर वाघमारे, संजीव खिलारे, ॲड. विठोबा पुजारी, विशालसिंग पवार, वैशाली गोपाळ शेळके, मनिषा सिद्धराम म्हमाणे, विजय कोकाटे, राहुल मोरे, बाळासाहेब गायकवाड, अशोक सरवदे, समाधान खंदारे, स्वाती दीपक गवळी, संजय विभुते, पांडुरंग सरवळे, पृथ्वीराज पवार, अस्लम चौधरी, लखन माने यांच्यासह जिल्हा परिषदेसाठी ९० तर पंचायत समिती साठी १०१ असे एकूण १९१ जणांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले असून यामध्ये एका उमेदवाराने दोन, तीन व चार असे नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत. यामध्ये उद्याच्या छाननी मध्ये अनेकांचे नामनिर्देशन पत्र बाद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी कुरुल ते मोहोळ शेकडो गाड्यांच्या तात्यासह येत मोहोळ येथे शक्ती प्रदर्शन केले, यांच्यासोबतच त्यांचे बंधू यांनी शिवसेनेकडून संतोष पाटील यांनी नरखेड ते मोहोळ असे शक्ती प्रदर्शन केले. तर भारतीय जनता पार्टी च्या लखन शिंदे, रामदास चवरे, कोमल अंकुश अवताडे, विमल तानाजी खताळ यांच्यासह भाजपच्या सर्व उमेदवारांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत लोकनेतेचे चेअरमन बाळराजे पाटील व अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वाखाली उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

**‘विद्यमान आमदारांनी दीड वर्षांत काय केले; मानाजी मामा पाठिंबा देतील'**



मला खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करता येत नाही. जे बोलतो तेच करतो. जे होत नाही त्याचा शब्द मी देत नाही. जनतेला खोट्या आश्वासनांची पूर्ण कल्पना आहे. ही निवडणूक आता जनतेने हाती घेतलेली आहे.माझे मामा मानाजी बापू माने यांच्यावर अन्याय झाला असला तरी ते मला मुलगा समजून नक्कीच पाठिंबा देतील अशी अपेक्षा आहे.विद्यमान आमदारांनी निवडून आल्यानंतर दीड वर्षांत काय केले, ते जनतेला माहित आहे. ते कोणत्या पक्षात आहेत. हे ही त्यांना कळत नाही. आम्ही राजन पाटील यांच्याशी निष्ठेने काम राहिलो आहोत. केवळ टीका करून राजकारण करता येत नाही, विकासासाठी काम करावे लागते.

**- रामदास चवरे**

**राजन पाटलांनी नव्या जुन्यांचा मेळ घालून न्याय दिला '**



आमचे नेते माजी आमदार राजन पाटील यांनी उमेदवारी देत असताना जुन्या व नव्या कार्यकर्त्यांचा मेळ घातला आहे.त्यामुळे आम्हाला न्याय मिळाला माझे पती अंकुश अवताडे यांनी केलेल्या सामाजिक कायार्ची ही पोहोच आहे.भारतीय जनता पार्टी ने माझ्यावर टाकलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडेन.

**- कोमल अंकुश अवताडे**

# काँग्रेस शक्तिप्रदर्शन करत नरखेड जि.प. गटातून लक्ष्मण मगर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## खा. शिंदे व पवार यांच्या नेतृत्वाखाली गट जिंकणार





**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी मोहोळ तालुक्यातील नरखेड जिल्हा परिषद गटातून काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार लक्ष्मण भुजंग मगर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. हा अर्ज खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश पवार व मोहोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी यांच्या नेतृत्वाखाली दाखल करण्यात आला. उमेदवारी अर्ज दाखल करताना काँग्रेसने या गटात जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

अर्ज दाखल करण्याच्या वेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला तसेच विविध समाजघटकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काँग्रेसच्या घोषणा, झेंडे आणि कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे परिसरात चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते. या निवडणुकीत नरखेड गटात काँग्रेसची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

खा. प्रणिती शिंदे यांनी लक्ष्मण मगर पक्षाचे तिकीट देताना लक्ष्मण मगर यांच्या कार्याचा उल्लेख करत सांगितले की, ‘लक्ष्मण मगर हे केवळ उमेदवार नसून ते संकटाच्या काळात जनतेसोबत उभे राहणारे कार्यकर्ते आहेत. पूरग्रस्त परिस्थितीत स्वतः बांधावर जाऊन शेतकऱ्यांची भेट घेणे, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करणे, पिकविमा, अतिवृष्टीचा निधी तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, हे त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. अशा काम करणाऱ्या नेतृत्वाला जिल्हा परिषदेमध्ये पाठवणे गरजेचे आहे.'

सोलापूर जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश पवार यांनी सांगितले की, ‘नरखेड गटात पाणीटंचाई, रस्ते, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे आजवर दुर्लक्ष झाले आहे. लक्ष्मण मगर यांच्याकडे काम करण्याची जिद्द, अनुभव आणि जनतेशी थेट संपर्क आहे. त्यांच्या माध्यमातून या भागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल.'

मोहोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, ‘या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा विजय निश्चित करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ पातळीवर काम करणे आवश्यक आहे. सर्व समाजघटकांना सोबत घेऊन, एकजुटीने लढा दिला तर नरखेड गटात काँग्रेसचा झेंडा नक्की फडकेल.'

उमेदवार लक्ष्मण भुजंग मगर यांनी उमेदवारीबद्दल समाधान व्यक्त करत उपस्थितांचे आभार मानले. ते म्हणाले, ‘आजपर्यंत शेतकरी असो वा सर्वसामान्य नागरिक, कोणताही प्रश्न असला तरी मी प्रत्यक्ष बांधावर, घराघरांत जाऊन तो सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. पिकविमा, अतिवृष्टीचा निधी, पूरग्रस्तांना मदत, युवकांचा रोजगार, महिला सक्षमीकरण आणि मूलभूत सुविधा हे माझे प्राधान्यक्रम राहतील. नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही.'

लक्ष्मण मगर यांच्याकडे काम करण्याची क्षमता, जनतेशी असलेले नाते आणि सतत धावून जाणारे नेतृत्व असल्यामुळे काँग्रेस पक्षाने नरखेड जिल्हा परिषद गटातून त्यांना अधिकृत उमेदवारी दिल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने नरखेड जिल्हा परिषद गटातील निवडणूक प्रचाराला अधिकृत सुरुवात झाली असून, येत्या काही दिवसांत प्रचार अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# मोहोळ नगरपरिषदेचा भोंगळा कारभार उघड; कोट्यवधींची यंत्रसामग्री धूळ खात पडून

## महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष अंजली वस्त्रेंचा आरोप

**मोहोळ (कटूसत्य वृत्त) :-** मोहोळ नगरपरिषदेच्या ढिसाळ, निष्काळजी आणि नियोजनशून्य कारभारामुळे शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालल्या आहेत. शहरातील बहुतांश भागात गटारी तुंबलेल्या असून, साफसफाई केवळ कागदावर आणि रंगरंगोटीपुरतीच मर्यादित असल्याचे वास्तव समोर आले आहे. गटारी नीट वाहत नसल्याने नागरिकांना दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव व विविध आजारांचा सामना करावा लागत असताना नगरपरिषद प्रशासन मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

या पार्श्वभूमीवर महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष अंजली वस्त्रे यांनी समस्याग्रस्त नागरिकांसह थेट पाहणी करून धक्कादायक बाबी उघड केल्या. मोहोळ शहराच्या पाण्याच्या टाकीखाली, गरड कॉलेजच्या मागील बाजूस पाहणी केली असता, गटारी साफसफाईसाठी वापरण्यात येणाऱ्या दोन मशिन्स, ट्रॅक्टरची ट्रॉली, पाण्याचा टँकर, जेसीबी, कचरा उचलण्याची मशीन आदी कोट्यवधी रुपयांची वाहने व यंत्रसामग्री वापराविना पडून असल्याचे निदर्शनास आले. ही वाहने अनेक दिवसांपासून धूळ खात, गंजत पडलेली असल्याचे स्पष्ट दिसत होते. सदर गाड्यांमधील बऱ्याच गाड्यांना आरटीओ कडून नंबरही मिळालेला नाही त्या नवीन गाड्या आहेत ह्या गाड्या आरटीओ रजिस्ट्रेशन न करता बाहेर कशा आहेत असा प्रश्न उपस्थित होत आहे.







विशेष म्हणजे, ही यंत्रसामग्री शहरातील प्रत्यक्ष कामांमध्ये कधीच वापरली जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मग ही वाहने नेमकी कुठे वापरली जातात? की मुळी वापरातच नाहीत? असे अनेक गंभीर प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाले आहेत. जर नगरपरिषदेकडे इतकी आधुनिक साधनसामग्री उपलब्ध असेल, तर शहरातील गटारी साफ का होत नाहीत? नागरिकांच्या आरोग्याशी खेळ का केला जात आहे? असा थेट सवाल अंजली वस्त्रे यांनी उपस्थित केला.

यावेळी त्यांनी नगरपरिषद प्रशासनावर गंभीर आरोप करत सांगितले की, ‘ही वाहने कोणी खरेदी केली, कोणाच्या मंजुरीने केली आणि नेमक्या कशासाठी केली, याचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे. कोट्यवधी रुपये खर्च करून खरेदी केलेली यंत्रसामग्री वापरात न आणता पडून राहणे म्हणजे जनतेच्या पैशांचा उघड अपव्यय आहे.'

या सर्व बाबींचा जाब विचारण्यासाठी महिला काँग्रेसच्या वतीने समस्याग्रस्त नागरिकांसह नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले. शहरातील गटारी तात्काळ साफ करण्यात याव्यात, पडून असलेली यंत्रसामग्री त्वरित प्रत्यक्ष कामासाठी वापरण्यात यावी, तसेच या खरेदी प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, समर्थ नगर, मोहोळ येथे सुरू असलेल्या रस्त्यावरील चेंबरच्या कामाची पाहणी करताना अंजली वस्त्रे यांना तेथील गटारी तुंबलेल्या असल्याचेही आढळून आले. यावेळी त्यांनी नगरपरिषदेला गटारी तात्काळ साफ करण्याच्या सूचना केल्या. रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत बोलताना त्यांनी नागरिकांना ‘मोहोळच्या सर्वांगीण विकासासाठी थोडासा त्रास सहन करावा लागेल, थोडे अड्जस्ट करावे लागेल,' असे आवाहन केले.

तसेच मोहोळ मेन रोडवरील भाजी विक्रेत्यांना पयार्यी जागा उपलब्ध करून देणे, व्यापाऱ्यांच्या समोर असलेले अतिक्रमण हटवणे या संदर्भात आज दुपारी चार वाजता नगरपरिषद कार्यालयात महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व व्यापारी, भाजी विक्रेते व शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अंजली वस्त्रे यांनी केले आहे. व्यापारी व नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाकडून या गंभीर आरोपांवर अद्याप कोणतीही ठोस प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गटारींची अवस्था अशीच राहिल्यास शहरात आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नगरपरिषद प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देणार का, की पुन्हा एकदा नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होणार, याकडे संपूर्ण मोहोळ शहराचे लक्ष लागले आहे.


VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# बाहेरच्यांनी सोलापूरची संस्कृती बिघडवू नये

## खा. प्रणिती शिंदेंनी पालकमंत्र्यांना सुनावले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** काँग्रेसच्या पराभवावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी "दोन कदम पीछे नही, 50 फूट नीचे गिरे, गिरे तो गिरे फिर भी टांग ऊपर" अशी काँग्रेसची स्थिती असल्याची टीका केली होती. या टीकेला खासदार प्रणिती शिंदे यांनी आज प्रत्युत्तर दिले. पालकमंत्र्यांच्या वक्तव्यावरून त्यांची संस्कृती दिसतात. सोलापूर हे प्रतिष्ठित शहर आहे, बाहेरच्या लोकांनी ही प्रतिष्ठा बिघडवू नये, असे खडेबोल पालकमंत्री गोरे यांना सुनावले.

२०१७ मध्ये भाजपच्या लाटेत महापालिकेत काँग्रेसचे १४ नगरसेवक निवडून आले होते. यंदा मात्र केवळ दोनच नगरसेवक निवडून आले. महापालिका निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाला आहे. हा पराभव वेदनादायी असला तरी तो अंतिम नाही. राजकारणात हार-जीत होत असते. मात्र, कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास, निष्ठा आणि प्रामाणिकपणा हीच खरी शिदोरी असते, असा भावनिक साद खासदार शिंदे यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून पत्रातून साधला होता.

या पत्रावरून काँग्रेसच्या पराभवावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवारी खासदार शिंदे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, काँग्रेस पक्षाचे उमेदवार कोण होते हे हे खासदारांना माहिती नाही. पक्षाच्या प्रचार मोहिमेत त्या सहभागी नव्हत्या. दिल्लीत बसून महापालिकेच्या निवडणुकीचे नियोजन करतात तर मग यापेक्षा चांगला निकाल येऊच शकत नाही.

"दोन कदम पीछे नही, 50 फूट नीचे गिरे, गिरे तो गिरे फिर भी टांग ऊपर" अशी ही अवस्था असल्याची टीका पालकमंत्र्यांनी केली होती. त्याला उत्तर देताना खासदार शिंदे म्हणाल्या, पालकमंत्री ज्या पद्धतीने बोलत आहेत, त्यावरून त्यांचे संस्कार व संस्कृती कळते. महापालिका निवडणुकीत त्यांनी जे काय केले, ते सर्वांनी पाहिलेच आहे. सोलापूर एक प्रतिष्ठित शहर आहे, बाहेरच्या लोकांनी येथे येऊन संस्कृती बिघडवू नये, असा टोलाही शिंदे यांनी लगावला.

# सोलापूरात 'ठाकरेंच्या शिवसेने'मध्ये मोठी खांदेपालट

## संपर्क प्रमुखपदी सुषमा अंधारे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात मोठ्या प्रमाणात संघटनात्मक खांदेपालट करण्यात आली आहे. सोलापूर शिवसेनाच्या संपर्क प्रमुखपदी शिवसेनेच्या फायरब्रँड नेत्या सुषमा अंधारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. महापालिका निवडणुकीच्या ऐन तोंडावर सोलापूरमधील शिवसेनेला मोठा धक्का बसला होता. तत्कालीन संपर्क प्रमुख अनिल कोकीळ



यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे पक्षात गळती वाढली होती. त्यानंतर सोलापूर महापालिका निवडणुकीआधीच ठाकरे गटातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते पक्ष सोडून गेल्याने संघटनात्मक आव्हान उभे राहिले होते.

(पान 2 वर..)

## संपादकीय

# दावोसची आकडेमोड आणि महाराष्ट्राची वस्तुस्थिती

दावोस ही केवळ बर्फाच्छादित डोंगरांमधील परिषद नाही; ती राज्यांच्या आर्थिक धोरणांची, नेतृत्वाच्या विश्वासार्हतेची आणि गुंतवणुकीच्या दाव्यांची कसोटी असते. महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र गेल्या काही वर्षांतील दावोस दौरे हे वास्तवापेक्षा जास्त आकडे, कमी पारदर्शकता आणि मोठ्या अपेक्षांची फसगत अशीच ओळख निर्माण करत आहेत.

**२०२३: दावे मोठे, वास्तव जुनेच**

जानेवारी २०२३ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दावोसला गेले, तेव्हा १ लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांचा गाजावाजा करण्यात आला. मात्र नंतर लक्षात आले की, यातील काही प्रमुख कंपन्या या आधीच छत्रपती संभाजीनगर, जालना आणि चंद्रपूर जिल्ह्यात कार्यरत होत्या. म्हणजेच नव्या गुंतवणुकीपेक्षा जुने प्रकल्प नव्या आकड्यांत मांडले गेले.

याच काळात वेदांता–फॉक्सकॉनसारखा १ लाख ५८ हजार कोटी रुपयांचा, एक लाख रोजगार देणारा प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातला गेला. त्याचबरोबर मिहानमधील २२ हजार कोटींचा टाटा–एअरबस प्रकल्प, रायगडमधील ३ हजार कोटींचा बल्क प्रकल्प आणि इतर मिळून सुमारे अडीच लाख कोटींची गुंतवणूक राज्याबाहेर गेली. ही केवळ आकड्यांची नव्हे, तर लाखो तरुणांच्या रोजगाराच्या संधींची हानी होती. त्यामुळे राज्यातील जनतेत संताप असणे स्वाभाविक होते.

**'मोठा प्रकल्प येणार' – पण आला नाही**

या नाराजीवर मलमपट्टी म्हणून 'वेदांतपेक्षा मोठा प्रकल्प महाराष्ट्राला मिळणार' अशी घोषणा करण्यात आली. परंतु तो प्रकल्प कागदावरच राहिला. प्रत्यक्षात महाराष्ट्रात काहीच आले नाही. अपेक्षा वाढवून वास्तव न देणे हीच या सगळ्याची खरी समस्या ठरली.

२०२४ मध्ये पुन्हा दावोस. यावेळी ४ लाख कोटी रुपयांचे करार झाल्याचा दावा करण्यात आला. अपेक्षा कमी दाखवून आकडे मोठे भासवण्याचा हा प्रयत्न होता. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्याच दिवशी १४ लाख कोटींच्या करारांची घोषणा केली आणि १५ लाख रोजगारांचा दावा केला.

**इथेच खरा प्रश्न निर्माण होतो:**

१४ लाख कोटींच्या गुंतवणुकीत केवळ १५ लाख रोजगार? याचा अर्थ ही गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर भांडवलसघन (capital intensive) आहे. अशी गुंतवणूक अर्थव्यवस्थेच्या आकड्यांना झळाळी देते, पण सामान्य तरुणांच्या हाताला काम किती देते, यावर गंभीर चर्चा होणे गरजेचे आहे.

**गुंतवणूक की बनवाबनवी?**

लोढा समूहाच्या डेटा सेंटर प्रकल्पासह अनेक सामंजस्य करार जाहीर झाले. परंतु महाराष्ट्रात आज प्रश्न हा नाही की किती एमओयू झाले; प्रश्न आहे की त्यातील किती प्रकल्प प्रत्यक्षात जमिनीवर उतरतात. दावोसनंतर अनेक करार वर्षानुवर्षे फाइलमध्येच अडकून राहिल्याचा अनुभव राज्याने आधीही घेतला आहे.

**राजकारण, निष्ठा आणि अस्वस्थता**

दावोस दौऱ्यांभोवती राजकीय नाट्यही कमी नाही. ७६ तास दावोसात जागरण, २८ तासांत दुप्पट गती – अशा दाव्यांनी प्रशासनाची गंभीरता हास्यास्पद बनते. उद्योगमंत्री उदय सामंत यांची निष्ठा, त्यांचे सर्व नेत्यांशी असलेले संबंध, आणि सत्तेत टिकून राहण्याची त्यांची राजकीय हातोटी हे वेगळेच प्रकरण आहे. मात्र मुख्यमंत्री शिंदे यांची अस्वस्थता, वाढत्या जबाबदाऱ्या राहुल शेवाळेंकडे सोपवणे, आणि पक्षांतर्गत ताकदीची चाचपणी हे सर्व सत्तेतील अस्थिरतेचे संकेत देतात.

महाराष्ट्राला दावोसची गरज आहे, पण दाव्यांची नव्हे, तर धोरणांची. आकड्यांची स्पर्धा थांबवून खालील प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत:

जाहीर केलेल्या करारांपैकी किती प्रकल्प प्रत्यक्ष सुरू झाले? त्यातून स्थानिक तरुणांना किती रोजगार मिळाला?

गुंतवणूक गुजरातसारख्या राज्यांकडे का वळते, याचे आत्मपरीक्षण झाले का?

आज महाराष्ट्राला फक्त 'मी जास्त आणले' अशी राजकीय मात नको, तर स्थिर, विश्वासार्ह आणि रोजगारकेंद्री आर्थिक दिशा हवी आहे.

दावोसची झगमग संपल्यानंतरही महाराष्ट्राच्या हातात काही उरते का, हाच खरा निकष आहे. आणि हो, 'पुन्हा येईन'चा जप नव्हे, तर पुन्हा फसवणार नाही अशी हमी आता जनतेला हवी आहे.

पान १ वरून

## सोलापूरात 'ठाकरेंच्या शिवसेने'मध्ये...

या पार्श्वभूमीवर सुषमा अंधारे यांच्याकडे सोलापूर जिल्ह्यात ठाकरेंच्या शिवसेनेची नव्याने बांधणी करण्याची मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आक्रमक भूमिका, स्पष्ट वक्तव्ये आणि संघटन कौशल्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या अंधारे यांच्याकडून गळती थांबवणे, नाराज कार्यकर्त्यांना पुन्हा पक्षात सक्रिय करणे आणि आगामी निवडणुकांसाठी संघटना मजबूत करणे, अशी अनेक आव्हाने असणार आहेत.

दरम्यान, शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे या सोलापूरच्याच असल्यामुळे येत्या काळात सोलापूरच्या राजकारणात अंधारे विरुद्ध वाघमारे असा थेट राजकीय सामना पाहायला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दोन्ही बाजूंच्या आक्रमक भूमिकेमुळे सोलापूरचे राजकारण अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

सुषमा अंधारे यांची नियुक्ती ही सोलापूरमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेसाठी नव्या पर्वाची सुरुवात ठरेल का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### वात्रटिका

**सत्तेची भूक**

न बाप राहिला पोराचा
न पोरगा राहिला बापाचा...
खेळ एवढा रंगला की आता
भरोसा नाही कोणाचा...
तिथे पोहचले जे कोणी
त्यांनाच माहित तिथले सुख...
म्हणून वाट्टेल त्या मार्गाने
भागवली जाते सत्तेची भूक...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# अन्यायाविरुद्ध लढणारे...श्री गुरु तेग बहादुर

श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल 1621 –नोव्हेंबर 1675) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. अमृतसर येथे जन्मलेल्या या महान गुरूंनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. धर्म, मानवता आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी त्यांनी प्राणांची आहुती दिली. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जाते.



**जीवनप्रवास आणि गुरु पदवी**

त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. बालपणी एका युद्धात दाखवलेल्या शौयार्मुळे त्यांना 'तेग बहादुर' हे नाव मिळाले. 1664 मध्ये त्यांना गुरु पदवी प्राप्त झाली. ते शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी आनंदपूर साहिब येथे ध्यान व सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले.

**बलिदान आणि शहिदी**

धार्मिक स्वातंत्र्य व मानवाधिकारांच्या रक्षणासाठी लढा देताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरुंगात ठेवण्यात आले. तेथे त्यांनी ध्यान व ईश्वर स्मरणाला प्राधान्य दिले. अखेरीस अन्यायाविरुद्ध उभे राहताना ते शहीद झाले. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले.

**साहित्य व तत्त्वज्ञान**

गुरु तेग बहादुर यांनी सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात समाविष्ट आहेत.

**प्रेरणादायी संदेश**

त्यांच्या शिकवणीत संयम, करूणा, सत्य आणि धैर्य यांचा संदेश आहे. त्यांनी लोकांना लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त राहण्याचे तत्त्वज्ञान दिले.

**राज्यस्तरीय कार्यक्रम**

गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व राज्यस्तरीय समितीच्या वतीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या कार्यशाळेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संकेतस्थळ व गीताचे लोकार्पण करण्यात आले. शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र येऊन या कार्यक्रमाला व्यापक स्वरूप देत आहेत.

**सामूहिक जबाबदारी**

गुरु तेग बहादुर यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी मानली जात आहे. तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समित्यांच्या माध्यमातून त्यांच्या हौतात्म्याचा इतिहास गावागावात पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**जिल्हा माहिती कार्यालय**
**सोलापूर**

# एलएलबी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा; एआयबीई परीक्षा आता वर्षातून दोनदा

**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त) :-** अखिल भारतीय बार परीक्षा (एआयबीई) आता अंतिम वर्षाच्या एलएलबी विद्यार्थ्यांसाठी अधिक सुलभ होणार आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाने (बीसीआय) सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, ही परीक्षा आता वषार्तून दोनदा घेतली जाईल आणि अंतिम सत्रातील विद्यार्थी त्यांच्या अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच परीक्षेला बसू शकतील.




एआयबीई ही परीक्षा कायद्याच्या पदवीधरांना वकिली करण्यासाठी अनिवार्य असून, २०२४ मध्ये दाखल केलेल्या रिट याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्याची परवानगी देणारा अंतरिम आदेश पारित केला होता. न्यायालयाने म्हटले की, अंतिम वषार्चे विद्यार्थी मध्येच परीक्षा सोडू नयेत, अन्यथा त्यांचे एक वर्ष वाया जाईल.

यासाठी बीसीआयने 'एआयबीई नियम, २०२६' तयार केले असून, त्यानुसार अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतिम परीक्षेनंतरच बार परीक्षेत बसण्याची परवानगी मिळेल. बीसीआयच्या वकिलांनी सांगितले की, वर्षातून दोन वेळा परीक्षा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी मिळणार आहे आणि त्यांचे करिअर अडथळ्याशिवाय पुढे चालू राहील.

ही सुधारणा विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा ठरेल, कारण यामुळे त्यांना बार परीक्षेसाठी अतिरिक्त तयारीसाठी वेळ मिळेल तसेच परीक्षा सुटल्यामुळे करिअरमध्ये विलंब होणार नाही.

# चोपडी जिल्हा परिषद गटातून भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार निवडणूक रिंगणात

## चोपडी जिल्हा परिषद गटाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध- चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाकडून भाजपचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत हे चोपडी जिल्हा परिषद गटातून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. चोपडी जिल्हा परिषद गटातून पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार यांचा चेतनसिंह केदार सावंत यांच्या उमेदवारीला मोठा पाठिंबा असून कोणत्याही परिस्थितीत चेतनसिंह केदार सावंत यांना निवडून आणू असा विश्वास चोपडी जिल्हा परिषद गटातील बांधवांकडून व्यक्त होत आहे. केंद्रात व राज्यात भाजप सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्यापासून वरिष्ठापर्यंत सर्वांच्या विकासासाठी योजना राबवणारे सरकार म्हणून भाजप –शिवसेना– राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या सरकारकडे पाहिले जाते.



चोपडी जिल्हा परिषद गटातील चोपडी येथे प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी व कार्यकर्त्यांच्या भेटी प्रसंगी चेतनसिंह केदार सावंत यांनी सरकारचे कार्य व चोपडी जिल्हा परिषद गटासाठी माझी भूमिका ही विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहील. चोपडी गावच्या विकासासाठी आपण सदैव तत्पर राहू व गावचे महत्वाचे प्रश्न व समस्या मार्गी लावू त्यासाठी सर्वांनी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सहकार्य करून मोठ्या बहुमताने विजयी करावे असे आवाहन चोपडी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार भाजपचे जिल्हाअध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले.

यावेळी सेवानिवृत्त सुभेदार अमोल बाबर यांनी उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांचे निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने स्वागत करीत चोपडी गावासाठी आपण विकास कामे अधिकाधिक मार्गी लावावीत अशी मागणी केली. या मागणीस चेतनसिंह केदार सावंत यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त करीत तुमच्या गावच्या सेवेसाठी आपण कायमस्वरूपी सहकार्य करू असे अभिवचन दिले.

यावेळी उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन केले तसेच ग्रामदैवत हनुमानाचे दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ फोडला. या प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी चोपडी गावचे उपसरपंच पोपटशेठ यादव व मित्रपरिवार,माजी आमदार शहाजीबापू पाटील प्रेमी कार्यकर्ते, ग्रामपंचायत सदस्य, शिवसेनेचे व भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवावर्ग, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर महापालिकेच्या वतीने मार्कंडेय महामुनी जयंतीनिमित्त अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने थोर ऋषी मार्कंडेय महामुनी यांच्या जयंती दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील मा.महापौर यांच्या कार्यालयामध्ये थोर ऋषी मार्कंर्डेय महामुनी यांच्या प्रतिमेस महापालिकेचे सहायक आयुक्त मनीषा मगर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, शाम कन्ना, जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार, सुचेता आमणगी, सिद्धू तिमीगार अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

# सांगोला तहसिल कार्यालयात नियंत्रण व तक्रार कक्ष स्थापन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक 13 जानेवारी 2026 रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक –2026 चा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांसाठी तीन निवडणूक निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली असून सांगोला तालुक्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी, महाउर्जा प्रकल्प, पुणे येथील अरुण आनंदकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सांगोला तालुक्यातील निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी तहसिल कार्यालय सांगोला येथे नियंत्रण व तक्रार कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मतदारांना तक्रारी नोंदविण्यासाठी दूरध्वनी क्रमांक 20187 –220218 उपलब्ध करून देण्यात आला आहे.

ही माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक –2026 तथा तहसिलदार सांगोला बाळूताई भागवत यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# कर्मवीर जयंती निमित्त रक्तदान शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयांमध्ये जगदाळे मामा यांच्या 123 व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्फत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या उत्साहामध्ये सहभाग नोंदवला याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. बी. शिंदे कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. गलांडे पी.आर. कार्यालयीन अधीक्षक मोरे टी. एस. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शेंडे एस. एस., प्रा.कुलकर्णी, प्रा. बोनगे व्ही. ई., डॉ. रनणनवरे, प्रा.जा यभाय एम. बी .प्रा. जाधव जी.व्ही. प्रा. गुरव एम.डी. , प्रा. शेळके एस. एम., प्रा. आदलिंगे ए. आर. व आदी कर्मचारी उपस्थित होते

या कार्यक्रमाचे आयोजन श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

# राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत भारत स्काऊट गाईडच्या खरी कमाई उपक्रमांतर्गत बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्याचे उदघाटन नेताजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, पालक शिक्षक संघाचे सदस्य शिवहार गाढवे यांच्या हस्ते करण्यात आले.प्रथम स्काऊट गाईड चळवळीचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या बाल आनंद मेळाव्यात ९० स्टॉल मांडण्यात आले होते.

पाचवी ते सातवीच्या १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतले. मेळाव्यात पुरी भाजी, समोसा, ढोकळा, कचोरी, गुलाबजाम, वडापाव, डबल का मीठा, पावभाजी, रसना, मिल्क शेक, कोबी मंचूरियन, भेळ , मसाला दूध, असे विविध रुचकर पदार्थ विद्यार्थ्यांनी बनवून विक्री केले. मेथी, कोथिंबीर, शेपू, पुदिना, वांगी बटाटे, काकडी, गाजर, मिरची, लिंबू असे विविध पालेभाज्या विक्रीसाठी ठेवले होते. मेळाव्यातून वीस हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली.या बाल मेळाव्यात विद्यार्थ्यांनी आनंद घेतले. विद्यार्थ्यांना व्यवहार कसा करावा, पैशाचे देवाण–घेवाण कसे करावे, उद्योग काय असतो, पदार्थ कसे बनवावे? खरी कमाई कशी असते,कष्टाचे फळ कशी मिळते या सर्व गोष्टींची माहिती होण्यासाठी समजण्यासाठी बाल आनंद मेळावा घेतल्याचे मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी सांगितले. स्काऊटर हणमंत कुरे, गाईडर वैशाली गुजर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षेकेत्तर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत माकपचे प्रथमच उमेदवार रिंगणात

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 मध्ये प्रथमच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) आपले उमेदवार रिंगणात उतरवत आहे. या निवडणुकीत पंचायत समितीसाठी पाच तर जिल्हा परिषदेसाठी एक उमेदवार उभे करण्यात आले आहेत.

कुंभारी, धोत्री, सांगोला, मंद्रूप, चपळगाव या भागांमध्ये माकपचा संघटित प्रभाव असून, स्थानिक शेतकरी व मतदारांच्या सक्रिय सहकार्याच्या जोरावर पक्षाचे उमेदवार विजय मिळवतील, असा विश्वास पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी व्यक्त केला आहे. विशेषतः रे नगर, गोदूताई परुळेकर नगर, कुंभारी व लगतच्या परिसरात पक्षाची मजबूत पकड आहे.

जिल्हा परिषदेसाठी कुंभारी मतदारसंघातून कु. प्रियांका दोंतुल या उमेदवार रिंगणात आहेत. येत्या 8 फेब्रुवारी रोजी त्यांचा विवाह सोहळा असला तरी, त्या कॉ. नरसय्या आडम मास्तर यांचे जुने सहकारी व ज्येष्ठ कार्यकर्ते असलेल्या कुटुंबातून असल्याने त्यांना ही संधी देण्यात आली आहे.



पंचायत समिती धोत्री गण मधून भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाच्या राज्य समिती सदस्या, तडफदार व उच्च शिक्षित तरुणी अश्विनी आडम या उमेदवार आहेत.

तर कुंभारी गणातून नितीन यादगिरी, योगेश अकीम,मंद्रूप येथून यासीन मकानदार, आणि सांगोला चोपडी गणातून अतुल फसाले, चपळगाव गण राजेंद्र स्वामी मधून हे उमेदवार पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

बुधवारी सकाळी ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर व जिल्हा सचिव कॉ युसुफ शेख मेजर यांच्या नेतृत्वाखाली सर्व उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.यावेळी पक्षाचे राज्य समिती सदस्य ॲड अनिल वासम,विल्यम ससाणे, बापू साबळे,वसीम मुल्ला आदींची उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत ही निवडणूक लढवली जात असल्याचे माकपच्या वतीने सांगण्यात आले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बेंबळे जि.प. गटातून संभाजी ब्रिगेडच्या शिवमती सुनिता पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## माढ्यात संभाजी-जिजाऊ ब्रिगेडचे शक्तिप्रदर्शन



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील बेंबळे जिल्हा परिषद गट क्रमांक १२ या मतदारसंघातून संभाजी ब्रिगेडच्या अधिकृत उमेदवार शिवमती सुनिता तात्यासाहेब पाटील (सापटणे-टें) यांनी आज आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शिल्पा ठोकडे यांच्याकडे माढा येथे दाखल केला. या प्रसंगी संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकप्रकारे संघटनेचे शक्तिप्रदर्शन केले.

उमेदवारी अर्ज दाखल करताना जिजाऊ ब्रिगेडच्या शिवमती लता जगदाळे, संभाजी ब्रिगेडचे राज्य कार्यकारिणी सदस्य शिवश्री दिनेश जगदाळे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शिवश्री सचिन जगताप, जिल्हाध्यक्ष शिवश्री सचिन खुळे, माजी जिल्हा सचिव शिवश्री सुहास टोणपे, तालुका कार्याध्यक्ष शिवश्री रामभाऊ मिटकल, माढा तालुकाध्यक्ष अविनाश पाटील, तालुका उपाध्यक्ष अरूण जगताप, वाय. जी. भोसले सर, पिंपळनेर गटप्रमुख अभयसिंह पाटील, शिवश्री प्रशांत गिड्डे, सुनिल जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शिवमती सुनिता पाटील या सामाजिक कार्यातून पुढे आलेल्या, महिलांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या आणि सर्वसामान्यांशी थेट नाते जोडणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. ग्रामीण भागातील पाणीटंचाई, रस्ते, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण तसेच शेतकरी व कष्टकरी जनतेच्या प्रश्नांना जिल्हा परिषद स्तरावर प्रभावीपणे मांडण्याची त्यांची भूमिका ठाम आहे.

उमेदवार शिवमती सुनिता पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना सांगितले की, 'बेंबळे गटातील नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो मी प्रामाणिकपणे जपेन. जिल्हा परिषदेमध्ये सामान्य जनतेचा आवाज बनून काम करेन. महिलांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे.'

उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने बेंबळे जिल्हा परिषद गटातील निवडणूक प्रचाराला अधिकृत सुरुवात झाली असून, संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून ही निवडणूक ताकदीने लढवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. येत्या काळात या मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग येण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# सोलापूरचे आयटी पार्क होणार वास्तवात !

## होटगी रोडवरील ५० एकर जागा हस्तांतरणासाठी हालचाली वेगात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या औद्योगिक आणि रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी असलेला आयटी पार्क प्रकल्प अखेर प्रत्यक्षात येण्याच्या मार्गावर आहे. होटगी रोड परिसरातील जलसंपदा विभागाची ५० एकर जमीन आयटी पार्कसाठी उद्योग विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत उद्योग विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवले असून, जागा विनामूल्य देण्याचा निर्णय जलसंपदा मंत्री घेणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

उद्योग विभागाचे प्रादेशिक अधिकारी शिवाजी राठोड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र पाठवून संबंधित जमीन उद्योग विभागाकडे हस्तांतरण करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याची विनंती केली आहे. जमीन ताब्यात आल्यानंतर एमआयडीसीमार्फत आराखडा तयार करून उद्योजकांच्या गरजेनुसार प्लॉटिंग करण्यात येणार आहे.

अभियंत्यांचे स्थलांतर थांबणार – सोलापूर शहर व जिल्ह्यात सध्या १५ अभियांत्रिकी महाविद्यालये असून, दरवर्षी सुमारे साडेसहा हजार अभियंते शिक्षण पूर्ण करतात. मात्र अपेक्षित रोजगार उपलब्ध नसल्याने साडेचार ते पाच हजार अभियंते दरवर्षी पुणे, मुंबई, नाशिक, हैदराबाद व बंगळुरूकडे स्थलांतरित होत आहेत. आयटी पार्क उभारल्यानंतर स्थानिक पातळीवरच रोजगारनिर्मिती होऊन हे स्थलांतर कायमचे थांबेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

राजकीय पातळीवर पाठबळ – या प्रकल्पासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. देवेंद्र कोठे, सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह सर्व आमदार प्रयत्नशील असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सुरुवातीपासून या प्रकल्पाकडे लक्ष दिले आहे.

### जमीन विनामूल्य की रेडीरेकनर दराने ?

होटगी रोड परिसरातील ही जमीन सध्या जलसंपदा विभागाच्या मालकीची आहे.रेडीरेकनर दरानुसार जमीन देण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाचा असला, तरी उद्योग विभागाने ती जागा विनामूल्य घेण्याचा निर्णय घेतला आहे. या विषयावरचा अंतिम निर्णय जलसंपदा मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील नियामक मंडळात घेतला जाणार असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जमीन विनामूल्यच मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

२० ते २२ महिन्यांत आयटी पार्क – जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उद्योग विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू होईल. अंदाजे पुढील २० ते २२ महिन्यांत आयटी पार्क उभारला जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

हा प्रकल्प साकार झाल्यास सोलापूर आयटी हब म्हणून नव्या नकाशावर येण्याची दाट शक्यता असून, शहराच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

'आयटी पार्कसाठी जलसंपदा विभागाची जमीन उद्योग विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र पाठवले आहे. हस्तांतरणानंतर आराखडा तयार करून उद्योजकांच्या गरजेनुसार प्लॉटिंग केली जाईल.

**'शिवाजी राठोड,** प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, सोलापूर

# बजाज पुणे ग्रँड टूर २०२६:

# मुळशी-मावळ टप्प्यात ल्यूक मडग्वेचे वर्चस्व

## भारताचा हर्षवीर सिंग ठरला सर्वोत्तम भारतीय सायकलपटू



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** भारतातील पहिल्यावहिल्या 'UCI २.२' श्रेणीतील आंतरराष्ट्रीय बहु-स्तरीय सायकलिंग स्पर्धा 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६'च्या मुळशी-मावळ टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाच्या ल्यूक मडग्वे याने दमदार कामगिरी करत निर्विवाद वर्चस्व गाजवले, तर भारतीय राष्ट्रीय संघाच्या हर्षवीर सिंग सेखॉन याने सर्वोत्तम भारतीय सायकलपटू ठरण्याचा मान पटकावला.

हिंजवडी येथील टी.सी.एस. (TCS) सर्कल येथून सुरू झालेल्या ८७.२ किलोमीटरच्या 'मुळशी-मावळ माईल्स' या पहिल्या टप्प्यात ल्यूक मडग्वे याने अवघ्या २ तास २१ सेकंदात शर्यत पूर्ण करत विजेतेपद मिळवले. सुरुवातीपासूनच वेगवान आणि तांत्रिक खेळाचे दर्शन घडवणाऱ्या या टप्प्यात शेवटच्या काही क्षणांत मडग्वे याने निर्णायक आघाडी घेत विजयावर शिक्कामोर्तब केले.

एस्टोनियाच्या 'क्विक प्रो टीम'चा अँड्रियास मॅटिल्डास (०२:००:२७) दुसऱ्या, तर बेल्जियमच्या 'टार्टलेटो-इसोरेक्स' संघाचा योर्बेन लॉरिसन (०२:००:३०) तिसऱ्या क्रमांकावर राहिला. वउक नियमांनुसार पहिल्या तीन क्रमांकाच्या खेळाडूंना अनुक्रमे १०, ६ आणि ४ सेकंदांचा टाइम बोनस देण्यात आला असून, तो पुढील टप्प्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, शर्यत सुरू झाल्यानंतर पहिल्या चेकपॉईंटनंतर दुसऱ्या गटातील काही सायकलपटूंमध्ये अपघात झाला. सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि UCI च्या सुरक्षा प्रोटोकॉलनुसार स्पर्धा सुमारे २३ मिनिटे थांबवण्यात आली होती. वैद्यकीय आणि तांत्रिक पथकाने तातडीने मदत केल्यानंतर शर्यत पुन्हा सुरू करण्यात आली.

पहिल्या टप्प्यानंतर विविध श्रेणींतील आघाडीवर असलेल्या खेळाडूंना जर्सी प्रदान करण्यात आल्या. सर्वसाधारण वर्गीकरण आणि पॉइंट्स वर्गीकरणात ल्यूक मडग्वे याने यलो आणि ग्रीन जर्सी मिळवली. बेस्ट क्लायंबर म्हणून क्रिस्टियन रायलेनु (चीन) याला पोलका डॉट जर्सी, सर्वोत्तम आशियाई खेळाडू म्हणून जंबालजाम्ट्स सैनबयार (मंगोलिया) याला ऑरेंज जर्सी, सर्वोत्तम युवा खेळाडू म्हणून तामर स्पिएरो (नेदरलँड) याला व्हाईट जर्सी, तर सर्वोत्तम भारतीय खेळाडू म्हणून हर्षवीर सिंग सेखॉन याला ब्लू जर्सी प्रदान करण्यात आली.

या टप्प्यातील विजेत्या खेळाडूंचा गौरव खासदार मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, पिंपरी-चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह आदी मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आला.

आता सर्वांचे लक्ष उद्या, २१ जानेवारी रोजी होणाऱ्या 'मराठा हेरिटेज सर्किट' या दुसऱ्या टप्प्याकडे लागले आहे. १०५.३ किलोमीटरच्या या खडतर मार्गात सायकलपटूंना १,०५१ मीटरची उंची सर करावी लागणार असून, पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला तलाव परिसरातून जाणारा हा टप्पा खेळाडूंच्या सहनशक्तीची कसोटी पाहणारा ठरणार आहे.

पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पाच दिवसांच्या स्पर्धेत ३५ देशांतील १७१ आंतरराष्ट्रीय सायकलपटू सहभागी झाले असून, एकूण ४३७ किलोमीटरच्या या स्पर्धेमुळे पुण्याच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जागतिक स्तरावर दर्शन घडत आहे.

**पुढील टप्प्यांचे वेळापत्रक :**

- २१ जानेवारी : टप्पा २ – मराठा हेरिटेज सर्किट (१०५.३ किमी)
- २२ जानेवारी : टप्पा ३ – पश्चिम घाट प्रवेशद्वार (१३४ किमी)
- २३ जानेवारी : टप्पा ४ – पुणे प्राईड लूप (९५ किमी)

# जिल्हा परिषद-पंचायत समितीसाठी उमेदवारांची मोठी गर्दी; ४२५ अर्ज दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस जवळ आल्यामुळे जिल्ह्यात उमेदवारांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मंगळवारपर्यंत एकूण ४२५ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

जिल्हा परिषदेच्या ६८ गटांसाठी १५३ उमेदवारांनी १५७ अर्ज दाखल केले आहेत, तर पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी २६५ उमेदवारांकडून २६८ अर्ज सादर करण्यात आले आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस २१ जानेवारी असून, बुधवारी ही संख्या हजारावर पोहोचण्याची शक्यता आहे. आतापर्यंत १,३९६ उमेदवारी अर्ज विक्रीस आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली.

निवडणूक कार्यक्रमानुसार २२ जानेवारी रोजी अर्जांची छाननी होईल. त्यानंतर २३ ते २७ जानेवारी या कालावधीत अर्ज मागे घेता येणार आहेत. अंतिम उमेदवारांची यादी २७ जानेवारी रोजी दुपारी ३.३० वाजता जाहीर केली जाईल. मतदान ५ फेब्रुवारी रोजी होईल, तर मतमोजणी ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

रौफ जाफर तांबोळी, रा.पेनूर,ता.मोहोळ,जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरूध्द**

ग्रापंचायत पेनूर, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचे भाऊ इन्नुस जाफर तांबोळी जन्म दि.१/६/१९६६ रोजी पेनूर, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे भाऊ इन्नुस जाफर तांबोळी यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९६६ चे आभिलेखात अर्जदार याचे भावाची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.२१/१/२०२६. हुकुमावरून

सही/-
(शिक्का) तहसिलदार,मोहोळ.

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

# बाळीवेस परिसर व अक्कलकोट रोड मोकळे; महापालिकेची कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना होत असलेला त्रास लक्षात घेऊन महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने मंगळवारी दोन ठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. या कारवाईत बाळीवेस परिसर आणि अक्कलकोट रोडवरील वाहतुकीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यात आले. मंगळवारी सकाळच्या सत्रात बाळीवेस परिसरात भिंतीलगत रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेले आणि वाहतुकीस अडथळा ठरणारे पाच खोके जेसीबीच्या सहाय्याने जागेवरच निष्कासित करण्यात आले. यामुळे या परिसरातील रस्ता मोकळा झाला असून वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

सायंकाळच्या सत्रात अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने अक्कलकोट रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ दुसरी कारवाई केली. या कारवाईत रस्त्यावर उभ्या असलेल्या तीन चारचाकी हातगाड्या तसेच अन्य अतिक्रमणाचे साहित्य जप्त करण्यात आले.

अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून अपघातांची शक्यता वाढत असल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि सार्वजनिक रस्ते मोकळे करण्यासाठी अशा अतिक्रमणविरोधी कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहतील. नागरिकांनी नियमांचे पालन करून रस्त्यावर कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

गोरख मगरधन वाघचवरे, रा.भांबेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरूध्द**

ग्रापंचायत शिरापूर सो., ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार गोरख मगरधन वाघचवरे जन्म दि.३१/१/१९९५ रोजी पेनूर, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे गोरख मगरधन वाघचवरे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी १९९५ चे आभिलेखात अर्जदार याची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले. असे ता.२१/१/२०२. हुकुमावरून

सही/-
(शिक्का) तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

रौफ जाफर तांबोळी, रा.पेनूर,ता.मोहोळ,जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरूध्द**

ग्रापंचायत पेनूर, ता.मोहोळ, जि.सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचे भाऊ रशीद जाफर तांबोळी जन्म दि.१/६/१९५५ व भाऊ मोहम्मद जाफर तांबोळी जन्म दि.१/६/१९६३ रोजी पेनूर ता.मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे भाऊ रशीद जाफर तांबोळी, भाऊ मोहम्मद जाफर तांबोळी यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९५५ व १९६३ चे आभिलेखात अर्जदार याचे भावाची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/२/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.२१/१/२०२६. हुकुमावरून

सही/-
(शिक्का) तहसिलदार,मोहोळ.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# पूर्व भागात मार्कंडेय जन्मोत्सवाची धूम

## रक्तदान, अन्नदान कार्यक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भगवान श्री मार्कंडेय जन्मोत्सवानिमित्त शहराच्या पूर्व भागात सुमारे दोनशे ठिकाणी श्री मार्कंडेय मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असून विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, २१ जानेवारी रोजी जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला माधव नगर परिसरातील श्री प्रतिष्ठानच्या वतीने श्री मार्कंडेय महामुनींच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली.

यावेळी वैदिक मंत्रोच्चारात पूजन करण्यात आले असून शिवलिंग पूजन व दीपप्रज्वलनामुळे माधव नगर परिसर भक्तिमय झाला. तसेच सिद्धेश्वर पेठेतील श्री मार्कंडेय मंदिरावर पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या वतीने आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

मार्कंडेय जन्मोत्सवानिमित्त पूर्व भागातील विविध मंडळांच्या वतीने रक्तदान शिबिरे, अन्नदान कार्यक्रम तसेच धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने बुधवारी कुचन प्रशालेच्या प्रांगणात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी दिली.

या काळात मार्कंडेय मंदिरात धार्मिक कार्यक्रम सुरू असून दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

या प्रसंगी अखिल भारतीय युवजन संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवास संगा, प्रभाकर दिकोंडा, गोवर्धन बोगा, सुरेश कोकटनूर, ॲड. संदीप संगा, संतोष संगा, किसन पासकंटी, अजय आडम, विजय जटला, प्रकाश सामल, व्यंकटेश अंदाल, राजू पुट्टा, वैजनाथ उघडे, संतोष चोळ्ळे, महेश कल्याणम, बालाजी श्रीचिप्पा, अमोल पराळकर, अक्षय मंगळारम, राजू गाडी, बालाजी जोरीगल, श्रीपाद राजुल, महेश शेराल, अशोक कुरापाटी, अंबरीश पुट्टा, अक्षय वाघमारे, विनायक नल्ला, राहुल पसलादी, शेखर भोसले, स्वप्निल पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक उपस्थित होते.

# 'लाडक्या बहिणी' योजनेत ई-केवायसीमध्ये त्रुटी; प्रत्यक्ष पडताळणीसाठी आदेश





**मुंबई (कटूसत्य वृत्त) :** लाडकी बहीण योजनेअंतर्गत काही महिलांनी चुकीचे पर्याय निवडल्याचे आढळल्यामुळे आता या लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे यांनी ही माहिती एक्स या समाज माध्यमावरून दिली.

योजनेच्या निकषांनुसार लाभार्थी महिलेचे वय २१ ते ६५ वर्षांच्या दरम्यान असावे, लाभार्थी पात्र महिला असावी, आणि तिचा पती सरकारी कर्मचारी नसावा, याची पडताळणी अंगणवाडी सेविकांमार्फत केली जाणार आहे.

यावेळी लाभार्थ्यांना ई-केवायसीसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, वाशिमसह राज्यातील अनेक लाभार्थ्यांच्या ई-केवायसीमध्ये त्रुटी आढळल्यामुळे त्यांचे अनुदान थांबले होते. यामुळे आता प्रत्यक्ष पडताळणीच्या माध्यमातून या त्रुटी दूर करण्याचे काम सुरू केले जाणार आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 158

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# मार्ग बदलामुळे शेतकरी संभ्रमात; शक्तीपीठ महामार्गासाठी निवेदन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** शक्तीपीठ महामार्गाचे आरेखन पूर्वीच्या पद्धतीनेच करण्यात यावे, या मागणीसाठी मोहोळ तहसील कार्यालयावर शक्तीपीठ महामार्ग समर्थक नागरिक व शेतकरी बांधवांनी मोर्चा काढून तहसीलदारांना निवेदन दिले. मात्र या आंदोलनात भाजप व शिवसेना (शिंदे गट) यांनी स्वतंत्रपणे निवेदने सादर केल्याने दोन्ही पक्षांमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू झाल्याचे चित्र दिसून आले.

शक्तीपीठ महामार्गाचे उत्तर सोलापूर-मोहोळ-पंढरपूर-सांगोला-आटपाडी असे आरेखन यापूर्वी निश्चित करण्यात आले होते. या आरेखनात मोहोळ तालुक्यातील ११ गावांचा समावेश आहे. मोहोळ शहराजवळून जाणारा हा महामार्ग शहराच्या विकासाला चालना देणारा असून, मोहोळ शहर मुख्य प्रवाहाशी जोडले जाणार आहे. यासाठी शासनाच्या वतीने मोहोळ परिसरात अलाइनमेंट निश्चित करून शेतांमध्ये पोल रोवण्यात आले आहेत, झाडांची मोजणी झाली असून पाईपलाईन बांधकामासंदर्भातील कामेही एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी केली आहेत. शेतकऱ्यांना मोबदल्याबाबत माहिती देण्यात आली होती.

या प्रक्रियेमुळे मागील तीन वर्षापासून अनेक शेतकऱ्यांनी शेतीत पीक घेतले नाही, पाईपलाईन किंवा विहिरी खोदल्या नाहीत, झाडे लावली नाहीत तसेच घर बांधकामही केले नाही. काहींनी तर जमीन संपादित होणार या अपेक्षेने घर पाडले, दुसरीकडे शेत घेण्यासाठी ॲडव्हान्स दिला. मात्र अद्याप जमीन संपादन झालेले नाही. त्यातच मुख्यमंत्र्यांनी अचानक शक्तीपीठ महामार्गाच्या मार्गात बदल होणार असल्याचे संकेत दिल्याने शेतकरी वर्गात प्रचंड संभ्रम, नाराजी व हतबलता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर मोहोळ तालुक्यातील शक्तीपीठ महामार्ग समर्थक व शेतकरी बांधवांनी मोर्चा काढून जुनेच आरेखन कायम ठेवण्याची मागणी केली. शिवसेना (शिंदे गट) राज्य ओबीसी प्रमुख व मोहोळचे नगरसेवक रमेश बारसकर तसेच नूतन नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना (शिंदे) नगरसेवक लखन कोळी, अतुल कुर्डे, सरफराज सय्यद, काँग्रेस किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा. संग्राम चव्हाण, पद्माकर देशमुख, संग्राम चव्हाण आदी उपस्थित होते. चार दिवसांपूर्वीच या मोर्चाबाबत तहसील प्रशासनाला लेखी सूचना देण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

दरम्यान, त्याच दिवशी भाजप तालुकाध्यक्ष व नूतन नगरसेवक सतीश काळे यांच्या नेतृत्वाखाली भाजपकडून स्वतंत्र निवेदन देण्यात आले. यावेळी अजिंक्यराणा पाटील, नगरसेवक कुंदन धोत्रे, संतोष वायचळ, आबा आंडगे तसेच भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मुजीब मुजावर आदी उपस्थित होते.एकाच विषयावर दोन वेगवेगळी निवेदने सादर झाल्याने शक्तीपीठ महामार्गाच्या मुद्द्यावर राजकीय श्रेयवाद रंगत असल्याची चर्चा मोहोळमध्ये सुरू आहे.

# महापालिकेचा फॉर्म्युला झेडपीतही मतदानाआधी थेट खात्यात पैसे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका निवडणुकीप्रमाणेच आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर शेतकरी आणि लाडक्या बहिणींना आर्थिक लाभ देण्याचा फॉम्युर्ला पुन्हा वापरला जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषदेसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान असून त्याआधी अवघ्या काही दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ४ हजार रुपये तर लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपये जमा होणार आहेत.

महापालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान झाले होते. त्याआधी १३ जानेवारीला लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपयांचा हप्ता जमा झाला होता. या निवडणुकीत लाडक्या बहिणींनी सत्ताधाऱ्यांना पसंती दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले. आता हाच पॅटर्न जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राबवला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

राज्यात शेतकरी सन्मान निधीचे सुमारे ९० ते ९४ लाख लाभार्थी आहेत, तर ग्रामीण भागातील 'लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थींची संख्या सव्वाकोटीच्या आसपास आहे. शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारकडून प्रत्येकी दोन हजार रुपये असे एकूण चार हजार रुपये दर तीन महिन्यांनी मिळतात. केंद्र सरकारचा हप्ता वितरित झाल्यानंतर साधारण आठ दिवसांत राज्य सरकारकडून शेतकरी महासन्मान निधीची रक्कम जमा केली जाते.

कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, २३ जानेवारी रोजी केंद्र सरकारकडून



प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा हप्ता वितरित केला जाणार आहे. त्यानंतर राज्य सरकारकडून नमो शेतकरी महासन्मान निधीचा हप्ता देण्यात येणार असून, जानेवारीअखेर किंवा २ फेब्रुवारीपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी दोन हजार रुपये जमा होण्याची शक्यता आहे. यासाठी कृषी विभागाने वित्त विभागाकडे १,९३० कोटी रुपयांची मागणी केली आहे.

दरम्यान, लाडक्या बहिणींनाही दरमहा आर्थिक मदत दिली जाते. डिसेंबर महिन्याचा हप्ता महापालिकेच्या मतदानापूर्वीच वितरित झाला होता. आता जानेवारी महिन्याचा हप्ता १ ते ३ फेब्रुवारीदरम्यान महिलांच्या खात्यात जमा केला जाणार असल्याचे महिला व बालकल्याण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

**१० दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात ४ हजार रुपये**

केंद्र सरकारचा २ हजार आणि राज्य सरकारचा २ हजार असा एकूण ४ हजार रुपयांचा हप्ता अवघ्या १० दिवसांच्या कालावधीत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे झेडपी निवडणुकीआधी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**लाभार्थी यादी पडताळणी पूर्ण**

शासनाकडून जिल्ह्याला ४ लाख ८८ हजार शेतकरी लाभार्थ्यांची यादी प्राप्त झाली असून ती पडताळून शासनाकडे पाठविण्यात आली आहे. लवकरच लाभार्थ्यांना पुढील हप्ता मिळेल. आता तालुका कृषी अधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे थंब असल्याशिवाय पोर्टल उघडत नाही, अशी नवी कार्यपद्धत लागू करण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्रचार्य भोसले यांनी दिली.

**दोन्ही योजनांचे आकडे**

- शेतकरी सन्मान निधीचे लाभार्थी : ९४.२३ लाख
- आता मिळणारी रक्कम : प्रत्येकी ४,००० रुपये
- 'लाडकी बहीण' योजनेचे लाभार्थी : १.२३ कोटी
- आता मिळणारा हप्ता : प्रत्येकी १,५०० रुपये

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या आर्थिक लाभांमुळे ग्रामीण भागातील वातावरण तापले असून, आगामी मतदानावर त्याचा किती परिणाम होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वीज खंडित, सौरपंप रखडले

## रब्बी हंगामात शेतकरी अडचणीत


सौर पंप योजना नावालाच भारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 'मागेल त्याला सौर कृषी पंप' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत अर्ज मंजूर झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत सौर कृषी पंप बसविणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात मात्र वषार्नुवर्षे शेतकरी सौरपंपाच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र सोलापूर जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे यंदाच्या ऐन रब्बी हंगामातही हजारो शेतकऱ्यांना सौरपंप मिळाले नसल्याने शेतकरी वगार्तून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सतत खंडित होणारी वीज, वाढते वीज बिल आणि अपुऱ्या पुरवठ्यामुळे शेती सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला असताना शासनाने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र व शाश्वत सिंचनाचा पर्याय म्हणून 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना सुरू केली. या योजनेत सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांना केवळ १० टक्के तर अनुसूचित जाती-जमातीतील शेतकऱ्यांना ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरून सौर पॅनेल्ससह कृषी पंपाचा संपूर्ण संच दिला जातो. जमिनीच्या क्षेत्रानुसार ३ ते ७.५ एचपी क्षमतेचे पंप बसविले जातात.

या योजनेसाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज करावा लागतो. अर्ज मंजूर झाल्यानंतर महावितरणमार्फत शेतजमिनीचे सर्वेक्षण केले जाते. सर्वेक्षण अहवालास मंजुरी मिळाल्यानंतर पुरवठादार कंपनी नियुक्त केली जाते. त्यानंतर संबंधित कंपनीकडून शेतात सौरपंप बसवून तो कार्यान्वित केला जातो.

अर्ज मंजूर झाल्यानंतर पुरवठादार नियुक्त करताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वेळा रात्री-अपरात्री मोबाईलवर संदेश येतो. मात्र, तो संदेश पाहेपर्यंत संबंधित पुरवठादाराचा कोटा संपलेला असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा पुढील संदेशाची वाट पाहावी लागते आणि प्रक्रिया लांबणीवर पडते.

सौरपंप वेळेत न बसवल्याने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना पुरवठादारांकडून अतिरिक्त त्रास दिला जात असल्याचे आरोपही होत आहेत. प्रत्यक्षात सौरपंप कार्यान्वित करताना लागणारे वीट, वाळू, सिमेंट व इतर साहित्य पुरवठादाराने उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना, ते साहित्य शेतकऱ्यांनाच आणण्यास सांगितले जात असल्याचे शेतकरी सांगतात. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

एकीकडे पाणी उपलब्ध असूनही वीज नसल्याने पिकांना पाणी देता येत नाही, तर दुसरीकडे सौरपंपाच्या विलंबामुळे शेती धोक्यात आली आहे. त्यामुळे सौरपंप योजनेतील अडचणी तातडीने दूर करून शेतकऱ्यांना वेळेत पंप उपलब्ध करून द्यावेत, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# अंजली वस्त्रे बनल्या मोहोळ तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुका महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी अंजली अशोक वस्त्रे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि निदेर्शा नुसार केली गेली असून, जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा डॉ. सुवर्णा मलगोंड यांनी त्यांना अधिकृत निवड पत्र देऊन नियुक्तीची मान्यता दिली आहे.




अंजली वस्त्रे गेल्या अनेक वर्षापासून काँग्रेस पक्षाच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहून मोहोळ शहर व तालुक्यात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी महिला, युवक व सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन विविध सामाजिक व पक्षीय उपक्रमांद्वारे पक्षाची भक्कम बांधणी केली आहे. त्यांच्या या निष्ठावान कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना अंजली वस्त्रे म्हणाल्या, 'गेल्या काही वर्षापासून काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून मोहोळ शहर व तालुक्यात पक्षीय विचारधारेनुसार काम करण्याची संधी मिळाली. आज ही पदवी मला पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्य, गोरगरीब व वंचित जनतेला न्याय देण्यासाठी उपयोगी पडेल. आगामी काळात महिला संघटन अधिक बळकट करण्यावर आणि पक्षवाढीसाठी विशेष भर देणार आहे.'

त्यांच्या निवडीबद्दल काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, मोहोळ तालुक्यात महिला काँग्रेस संघटनाला नवचैतन्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आ. अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वात उमेदवारांचे अर्ज दाखल

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या वतीने जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी अधिकृत उमेदवारांचे अर्ज दाखल केले.

यावेळी माध्यमांशी बोलताना आमदार अभिजीत पाटील म्हणाले की, 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पूर्ण ताकदीने मैदानात उतरली आहे. विकासाला प्राधान्य देणारे, सर्वसामान्य जनतेशी जोडलेले



उमेदवार आम्ही दिले आहेत. युतीबाबत आमदार भालके यांच्यासोबत सकारात्मक चर्चा सुरू असून, लवकरच योग्य तो निर्णय होईल.'

जिल्हा परिषद गट - राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार- 1. करकंब - बाळासाहेब मारूती देशमुख, श्रद्धा अमोल शेळके, 2. भोसे - शन्मुखी भारत कोरके, सारिका संजय कोरके,3.रोपळे - गितांजली हनमंत साळुंखे, सावली अतुल गायकवाड,4. वाखरी - मयुरी संतोष बागल, शिला सूर्यकांत बागल, 5.भाळवणी - सुप्रिया सुनील गायकवाड, अनिता प्रदीप लोखंडे, 6.लक्ष्मी टाकळी - शत्रुघ्न दगडू रणदिवे, मल्हारी श्रीधर फाळके

पंचायत समिती गण - उमेदवारांची यादी-उंबरे- शहाजी माणिक मुळे, कल्याणी शहाजी मुळे, करकंब - श्रद्धा अमोल शेळके, धनंजय मोहन गुळमे, भोसे - भाग्यश्री आण्णा भुसनर, समता काकासाहेब पवार,

गुरसाळे - महादेव आण्णा पाटील, अतुल सत्यवान गायकवाड, रोपळे- जाईताई दिलीप कोरके, विजया विलास भोसले, सुस्ते- सावली अतुल गायकवाड, गितांजली हनमंत साळुंखे,पुळूज- वर्षाराणी भिवा शेंडगे,

गोपाळपूर - तारामती शरद मोरे, अमृता अमोल पाटील, वाखरी - आण्णा बलभीम भुसनर, शिवाजी तात्या मदने, पटवर्धन कुरोली- प्रमिला सोमनाथ झांबरे, दिपाली सागर नाईकनवरे, भाळवणी- वृशाली विलास गोफणे, अभिमान जालिंदर गोफणे, पळशी- अक्काताई बबन लोखंडे, अर्चना आबासाहेब रणदिवे, लक्ष्मी टाकळी- संदीप औदुंबर मांडवे, अभिजीत हाके, खर्डी- शत्रुघ्न दगडू रणदिवे, अमोल मच्छिंद्र पाटील, सरकोली- शुभांगी प्रविण भोसले, वर्षा दिपक भोसले

या उमेदवारी अर्ज दाखल करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित होते. स्थानिक विकास, शेतकरी प्रश्न, पाणीपुरवठा, रस्ते व मूलभूत सुविधांच्या मुद्द्यांवर निवडणूक लढवली जाणार असून, पंढरपूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस मजबूत पर्याय ठरेल, असा विश्वास आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केला.

# पराभवाने खचू नका, जनसामान्यांचा आवाज बनून काँग्रेस मजबूत करा- खा. प्रणिती शिंदे

## महानगरपालिका निवडणुकीत भाजप नव्हे, EVM निवडून आला आहे- मोहन जोशी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची, कार्यकर्त्यांची आढावा बैठक सोलापूर शहर जिल्हा काँग्रेसचे प्रभारी मोहन जोशी, खासदार प्रणिती शिंदे यांच्या व प्रमुख नेतेमंडळी यांच्या उपस्थितीत पार पडली.

या बैठकीचे प्रास्ताविक शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी केले. तसेच महानगरपालिका निवडणुकीतील उमेदवारांनी निवडणूक काळातील अनेक विषयांवर आपले विचार व्यक्त केले.

या बैठकीत खासदार प्रणिती शिंदे यांनी उमेदवार व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पराभवाने खचून न जाता नव्या जिद्दीने उभे राहण्याचे आवाहन केले. जनमाणसांचा आवाज बनून संघर्ष करत काँग्रेस पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वांनी पुन्हा कामाला लागावे, असे त्यांनी स्पष्ट केले. 'काँग्रेस पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. माझ्या रक्तात काँग्रेस आहे आणि कार्यकर्त्यांच्या ताकदीवरच मी खासदार आहे,' असे ठामपणे सांगत त्यांनी पक्षनिष्ठेवर भर दिला. सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक चुकीच्या निर्णयावर आणि अन्यायकारक धोरणांवर निर्भीडपणे भूमिका मांडण्याचे आवाहन करत, पक्ष अधिक सक्षम करण्यासाठी लवकरच सल्लागार समिती स्थापन केली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले. प्रत्यक्ष मैदानात उतरून लढणारेच खरे कार्यकर्ते असून त्यांनाच पुढील काळात अधिक ताकद दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

जनतेने मतांच्या माध्यमातून दिलेला आशीर्वाद महत्त्वाचा असल्याचे सांगत खासदार शिंदे म्हणाल्या की, निवडणुकीत पराभव झाला तरी पराभूत उमेदवारांनी शॅडो नगरसेवक म्हणून काम करत जनतेचा आवाज बनावे. नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात, केलेले कष्ट वाया जाऊ देऊ नयेत आणि पुन्हा जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले.

भाजपचे नगरसेवक जनतेची कामे करण्यात अपयशी ठरत असल्याने लोकांना काँग्रेसची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. भाजप न करू शकलेली कामे काँग्रेसने करावीत, लोकांच्या हक्कांची लढाई लढावी आणि लोकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे, असे त्यांनी नमूद केले. ह्अती तिथे माती. जेवढ्या जोराने वर गेले, तेवढ्याच जोराने खाली येतात. भाजपची ती वेळ आता सुरू झाली आहे,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेस हा तळागाळातील लोकांचा पक्ष असून काँग्रेस संपलेली नाही आणि कधीच



संपणार नाही, असे सांगत त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना आपल्या कुटुंबाचा भाग असल्याची भावना दिली. 'मी सदैव तुमच्या सोबत आहे,' असेही त्या म्हणाल्या.

निवडणुकीच्या संदर्भात बोलताना खासदार शिंदे यांनी सांगितले की, भाजपची निवडणूक लढाई ही सत्तेसाठी होती, तर काँग्रेसची लढाई ही तत्त्वांसाठी होती. 'लढून हरणे केव्हाही चांगले असते. आम्ही लोकांसाठी, त्यांच्या प्रश्नांसाठी आणि विकासासाठी लढलो. आम्ही लढलोच नाही, असा संदेश जाणे चुकीचे आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

भाजपच्या विजयापेक्षा काँग्रेसच्या पराभवाचीच अधिक चर्चा होत असल्याकडे लक्ष वेधत त्यांनी सांगितले की, काँग्रेसचे अनेक उमेदवार निवडणुकीपूर्वीच्या सर्व्हेमध्ये आघाडीवर होते. मात्र EVM घोटाळा, पैसा आणि सत्तेचा दुरुपयोग यामुळे भाजपचे उमेदवार निवडून आल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या नऊ-दहा वर्षातील भाजपचा भ्रष्टाचारी कारभार, टेंडरमधील टक्केवारी, नाकर्तेपणा, अघोषित आणीबाणीचे वातावरण आणि धार्मिक तेढ निर्माण करून सत्तेचा गैरवापर करण्यात आल्याची टीकाही त्यांनी केली.

या निवडणुकीत सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे संघर्ष केला असून, सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा एक आश्वासक चेहरा म्हणून स्वतःची ओळख निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच या निवडणुकीत सहकार्य करणारे सर्व समाजबांधव, मतदार बंधू-भगिनी आणि दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.

'मी जाती-धर्माच्या नावावर मत न मागता विकासासाठी मते मागितली. त्यामुळे पराभवाने खचून न जाता आपण सर्वांनी पुन्हा नव्या जोमाने कामाला सुरुवात करू,' असे सांगत त्यांनी आगामी निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाला नव्याने उभे करण्याचा निर्धार व्यक्त केला. सत्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी लढा सुरूच राहील. पराभवाने खचून न जाता पुढील लढाई ताकदीने लढणे हाच काँग्रेस पक्षाचा बाणा असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी स्पष्ट केले.

**सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजप नव्हे, EVM निवडून आला आहे. - मोहन जोशी यांचा आरोप**

सोलापूर शहर जिल्हा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत प्रभारी मोहन जोशी यांनी सत्ताधारी भाजप आणि निवडणूक प्रक्रियेवर जोरदार टीका केली. 'भाजप निवडून आलेला नाही, तर EVM निवडून आला आहे,' असा आरोप करत त्यांनी प्रभाग रचना, मतदार यादी आणि EVM यामध्ये मोठ्या प्रमाणावर घोळ झाल्याचे सांगितले. सर्व शासकीय यंत्रणा आणि निवडणूक आयोगाचा गैरवापर करून भाजपने विजय मिळवला असल्याचा आरोपही त्यांनी केला. मोहन जोशी म्हणाले की, या निकालानंतर खचून न जाता नव्या जोमाने पक्षाची संघटना उभी करण्याची सुरुवात करा. पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल. पुढील काळात चांगल्या, निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्त्यांची मजबूत फळी निर्माण करणे अत्यंत गरजेचे असून, त्यासाठी लवकरच प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

पालकमंत्र्यांवर टीका करताना ते म्हणाले की, काँग्रेसच्या जीवावर मोठे झालेले नेते आज काँग्रेसवरच टीका करत आहेत. त्यांचे प्रस्थ काँग्रेसमुळेच निर्माण झाले असून, भाजपच्या कार्यकर्त्यांपेक्षा जास्त निष्ठा दाखवण्यासाठी ते खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर टीका करत आहेत. अशा टीकेला योग्य आणि ठोस उत्तर दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

आपले नेते राहुल गांधी देशभर संघर्ष करत असून, येणारा काळ हा काँग्रेसचा आहे. काँग्रेसचे भविष्य उज्वल असून भाजपची वाटचाल आता संपण्याकडे सुरू झाली आहे, असा ठाम विश्वास व्यक्त करत मोहन जोशी यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने आणि निधारीने पुढील लढाईसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

यावेळी शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, नगरसेवक नरसिंह आसादे, माजी महापौर संजय हेमगड्डी, अरिफ शेख, माजी नगरसेवक रियाज हुंडेकरी, प्रवीणदादा निकाळजे, नरसिंग कोळी, प्रवक्ते अशोक निंबर्गी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, महिला काँग्रेस अध्यक्षा प्रमिलाताई तुपलवंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, ब्लॉक अध्यक्ष देविदास गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, अल्पसंख्याक काँग्रेस अध्यक्ष जुबेरभाई कुरेशी, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, भटक्या-विमुक्त विभाग अध्यक्ष युवराज जाधव, प्रवक्ते सेल अध्यक्ष नागनाथ कदम, शहर मध्य युवक काँग्रेस अध्यक्ष वाहिद बिजापूर, उत्तर शहर युवक काँग्रेस अध्यक्ष महेश लोढे, मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, माजी नगरसेवक सिद्धाराम चाकोते, भारती ईपलपल्ली, एन. के. क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वनाथ साबळे, अशोक कलशेट्टी, शुभांगी जाबा, महानंदा शिरसीकर, संघमित्रा चौधरी, प्रणा बंगाळे, दत्तू बंदपट्टे, प्रीती देवकते, कल्पना रव्वा, धोंडप्पा तोरणगी, खुद्दुसिया मणियार, नसीम खलिफा, शहजादिबेगम बडेपीर, शोहेब महागामी, सपना म्यागेरी, कल्पना नरोटे, बिलकिसबानो सलीम खान, सीमाताई यलगुलवार, परशुराम सतारवाले, शुभांगी लिंगराज, अयाज आळंद, विजयलक्ष्मी काळपगार, शिवशंकर अंजनाळकर, अझरुद्दीन शेख, प्रतीक्षा निकाळजे, किरण टेकाळे, अर्चना जाधव, राजनंदा डोंगरे, दिपाली शहा, राजू चव्हाण, सरस्वती आठवले, रविकुमार यलगुलवार, नितीन घुगे, हासिब नदाफ, अनिल मस्के, राजन कामत, लखन गायकवाड, नागेश म्याकल, डॉ. आप्पासाहेब बगले, वशिष्ठ सोनकांबळे, दिनेश म्हेत्रे, सुभाष वाघमारे, राजेश झांपले, सागर उबाळे, भीमराव शिंदे, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, माजी महिला काँग्रेस अध्यक्षा सुमन जाधव, करीमुनिसा बागवान, शोभा बोबे, मुमताज तांबोळी, उपेंद्र ठाकूर, ज्योती गायकवाड, सलीमा शेख, पूजा चव्हाण, छाया हिरवटे, नूरअहमद नालवार, दशरथ सामल, पुरुषोत्तम श्रीगादी, कालिदास काळपगार, सुनील सारंगी, शुभम एकलदेवी, तौसीफ शेख, अजीम शेख, माजिद शेख, नागनाथ बंगाळे, आकाश झांबळे, चंद्रकांत टिक्के, शिवाजी साळुंखे, मोहसीन फुलारी, अभिलाष अच्युतगटला आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.